महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६११ दि. १४/१०/२०२०

**विषय : कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारांकरीता अग्रीम रक्कम मंजूर करण्याच्या अधिकारा मधील सुधारणांबाबत.**

**संदर्भ : १. स.आ.क्र. २० (क), दि. १७.०६.१९६३.**
**२.स.स्था. आ.क्र. ३७७ दि. ३०.०८.१९५८ चे सुधार पत्र क्र. १२ दि. १२.०२.१९९८.**
**३. प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९, दि. १९.०५.२००६.**
**४. प्रशासकीय परिपत्रक क्र. २७२ दि. ३०.१२.२००९.**
**५. प्रशासकीय परिपत्रक क्र. २९७ दि. ०७.०७.२०२०.**
**६. प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७७ दि. ०४.०१.२०१४.**

कामावर असताना कर्मचाऱ्यास अपघात झाल्यास त्यावर तात्काळ वैद्यकीय उपचार सुरु करता यावेत यासाठी स. स्था.आ. क्र.३७७ दि.३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.०२.१९९८ अन्वये तात्पुरती अग्रीम रक्कम मंजूर करण्याचे अधिकार क्षेत्रिय कार्यालयातील अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच सदर उपचारापोटी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याबाबतचे अधिकार प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि. १९.०५.२००६ अन्वये सुधारित करण्यात आलेले आहेत.

२. तथापि, अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांवर रुग्णालयामध्ये उपचार पूर्ण झाल्यानंतर संबंधीत रुग्णालयाची देयके अशा कर्मचाऱ्यांची वैद्यकीय रजा, उपचार दरम्यान झालेल्या मृत्यू इत्यादी कारणांमुळे अदा करताना बराचसा विलंब होतो. यास्तव त्या-त्या रुग्णालयांची कंपनीच्या अपघातग्रस्त कर्मचाऱ्यांवर केलेल्या उपचारापोटी प्रलंबित देयके त्वरित अदाकरता यावीत या दृष्टीकोनातून अग्रीम रक्कमेच्या मंजूरीकरीता प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

३. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचार विनिमय करुन कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना अग्रीम रक्कम मंजूर करण्याकरीता पूर्वी प्रदान करण्यात आलेले अधिकार खालील प्रमाणे सुधारित करण्यास मंजूरी दिलेली आहे.

| अ.क्र. | क्षेत्रिय तथा सांघिक कार्यालयातील सक्षम अधिकारी | सद्याची तरतूद (अग्रीम राशीची रक्कम ) | सुधारित तरतूद ( अग्रीम राशीची रक्कम) |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | रु.२०,०००/- | रु.४०,०००/- |
| २ | अधीक्षक अभियंता | रु.३०,०००- | रु.६०,०००/- |
| ३ | मुख्य अभियंता | रु.१,००,०००/- | रु.१,५०,०००/- |
| ४ | संबंधीत प्रादेशिक कार्यकारी संचालक | रु.३,००,०००/- | रु.४,५०,०००/- |
| ५ | संचालक (मासं) | - | रु.८,००,०००/- |
| ६ | संचालक (वित्त) | ३,००,०००/- ते रु.७,००,०००/- पर्यंत | रु.८,००,००१/-त्यापेक्षा अधिक रक्कमेसाठी |
| ७ | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | रु.७,००,०००/- पेक्षा अधिक रक्कमेसाठी | - |

४. अपघातग्रस्त कर्मचाऱ्यांवर रुग्णालयातील उपचार पूर्ण झाल्यानंतर रुग्णालयाने त्यास तातडीने उपचाराअंती सोडणे करीता याबाबत संबंधीत विभागाच्या /मंडलाच्या /परिमंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्या-त्या प्रकरणी रुग्णालयात झालेल्या वैद्यकीय खर्चाची देयके १५ दिवसांत अदा करण्यात येतील याबाबतचे हमीपत्र द्यावे. तसेच कर्मचाऱ्यास रुग्णालयामधून उपचाराअंती सोडल्यानंतर अथवा कर्मचाऱ्याचे उपचार सुरु असताना निधन झाल्यास वैद्यकीय देयकांची रक्कम तात्काळ मंजूर करण्यात यावी व सदर अग्रीम रक्कमेचा धनादेश रुग्णालयाच्या नावाने अदा करण्यात यावा.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या Employee Portal e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**